Literacy for a Billion

Movie: Raja Shivchhatrapati
Year: 1974

Song: Divsa Ujedi Hee Punav
Lyricist: Sudhir Moghe

हे दिवसा उजेडी ही पुनव नाचून रं
दिवसा उजेडी ही पुनव नाचून रं
आभाळी चांदवा आला
आभाळी चांदवा आला
माझ्या समिंदरा माझ्या समिंदरा
माझ्या समिंदरा माझ्या समिंदरा
तुझ्या भाग्याचा मुहरत झाला
तुझ्या भाग्याचा मुहरत झाला
छाताडावरती नाचत होती
छाताडावरती नाचत होती
परक्यांची गलबत सारी
नांगराने त्यांच्या केल्या रं जखमा
नांगराने त्यांच्या केल्या रं जखमा
होव्याला वाहत्या उरी
भवानी पेलितं वेदना मारीत
भवानी पेलितं वेदना मारीत
दुर्गांचा सर्जा आला हा
आला दुर्गांचा सर्जा आला
माझ्या समिंदरा माझ्या समिंदरा
माझ्या समिंदरा माझ्या समिंदरा
तुझ्या भाग्याचा मुहरत झाला
तुझ्या भाग्याचा मुहरत झाला

शिवाजीराजाची येताच चाहूल
येताच चाहूल
हो हो शिवाजीराजाची येताच चाहूल
येताच चाहूल
रात अशुभाची गेली रं
रात अशुभाची गेली रं
रात अशुभाची गेली रं
रात अशुभाची गेली रं
सारंगा बघ रं
आहा आहा आहा
सारंगा बघ रं आभाळ हसलं
सारंगा बघ रं आभाळ हसलं
भगवी पहाट झाली रं
भगवी पहाट झाली रं
लाटा लाटांवर सांडलं केशर
लाटा लाटांवर सांडलं केशर
दर्यात सूर्या न्हाला
न्हाला दर्यात सूर्या न्हाला
माझ्या समिंदरा माझ्या समिंदरा
माझ्या समिंदरा माझ्या समिंदरा
तुझ्या भाग्याचा मुहरत झाला
हो तुझ्या भाग्याचा मुहरत झाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*